भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त १२५ निवडक गावांतील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांचा सर्वांगीण विकास करणे

वणंद, ता. दापोली, जि. रत्नागिरी.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : दवसु-२०१८/प्र.क्र.६१/अजाक
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: २६ ऑगस्ट, २०१९

वाचा :

१. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक: सान्यावि-२०१५/ प्र. क्र.१६३/ बांधकामे, दिनांक ०९ ऑक्टोबर,२०१५.
२. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक: दवसु - २०१६ / प्र. क्र. १५६/ अजाक, दिनांक १२ ऑगस्ट,२०१६.
३. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक: दवसु-२०१६ / प्र. क्र. २२७/ अजाक, दिनांक २६ ऑक्टोबर, २०१६.
४. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र,क्रमांक:सकआ / मावक /अजानबौघवि / निअजानबौ / डॉबाआं१२५जयंती / २०१७ / का-१२ /८५१, दिनांक ३० जानेवारी, २०१८.

प्रस्तावना:

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५व्या जयंती वर्षानिमित्त १२५ निवडक गावांतील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांचा सर्वांगिण विकास करण्याचा निर्णय शासनाने उपरोक्त वाचा २ अन्वये घेतलेला आहे. सदर निर्णयांतर्गत "वणंद, ता. दापोली, जि. रत्नागिरी" येथील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा समावेश उपरोक्त वाचा ३ अन्वये करण्यात आलेला आहे. यास अनुसरून वणंद, ता. दापोली, जि. रत्नागिरी येथील अनुसूचित जाती व नवबौध्द वस्त्यांच्या विकासाच्या कामांचे सविस्तर अंदाजपत्रक सन २०१७-१८ च्या दरसूचिवर आधारित शाखा अभियंता, जिल्हा परिषद (कामे), उप विभाग, दापोली, जि. रत्नागिरी यांनी तयार केलेली असून उप विभागीय अभियंता, जिल्हा परिषद (कामे), उप विभाग, दापोली, जि. रत्नागिरी आणि कार्यकारी अभियंता, रत्नागिरी जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, चिपळूण, जि. रत्नागिरी यांनी साक्षांकित केलेले आहे. सदर सविस्तर अंदाजपत्रक उपरोक्त वाचा ४ अन्वये आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शासनास निर्णयासाठी सादर केलेले आहे, सदर सविस्तर अंदाजपत्रक खालीलप्रमाणे :

अ.क्र.	कामाचे नाव	छाननीअंती परिगणित रक्कम रुपये
१.	वणंद बौध्दवाडी (दापोली शिवाजीनगर-भौजाळी-वणंद रस्ता), येथे मोऱ्या व संरक्षण भिंत यांची सुधारणा करणे, प्रा. मा. ४८, दापोली	३१,८८,०००
२.	वणंद बौध्दवाडी येथे शौचालय युनिट बांधणे	२४,१७,८२०
३.	वणंद बौध्दवाडी येथे ॲप्रोच रस्ता व मातोश्री रमाई आंबेडकर सामाजिक सभागृह येथे संरक्षक भिंत बांधणे	२२,९५,०००
	एकूण	**७९,००,८२०**
अक्षरी रुपये एकोणऐंशी लक्ष आठशे वीस फक्त		

सदर प्रस्तावित कामांच्या सविस्तर अंदाजपत्रकास प्रशासकिय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:</u>

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५व्या जयंती वर्षानिमित्त १२५ निवडक गावांतील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांचा सर्वांगिण विकास करण्याच्या निर्णयास अनुसरुन आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वणंद, ता. दापोली, जि. रत्नागिरी येथील अनुसूचित जाती व नवबौध्द वस्त्यांच्या विकासाचा सादर केलेल्या उपरोक्त रुपये ७९,००,८२०/- (अक्षरी रुपये एकोणऐंशी लक्ष आठशे वीस फक्त) च्या सविस्तर अंदाजपत्रकास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

१. काम सुरु करण्यापूर्वी नमूना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तुविशारदांकडून मंजूरी घेऊनच काम सुरु करण्यात यावे.

२. ढोबळ स्वरूपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घेण्यात यावे.

३. प्रत्यक्ष काम करतेवेळी शासन निर्णय, पर्यावरण विभाग, क्रमांक: इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/तां.क.-१, दिनांक १० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

४. शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांक: बीडीजी-२०१७/ प्र.क्र. ६०/ इमारती-२, दिनांक ०७ जुलै, २०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

५. प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यापूर्वी सदर अंदाजपत्रकास उपभोक्ता विभागाच्यावतीने सक्षम प्राधिकारी म्हणून प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण विभाग, मुंबई यांनी साक्षांकन करणे आवश्यक आहे.

६. नियोजित जागा सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन सदर कामाच्या निविदा सूचना प्रसिध्द करण्यात याव्यात.

७. सदर प्रकरणी शासन निर्णय, दिनांक १२ ऑगस्ट, २०१६ मधील इतर अटी परिच्छेदातील अनुक्रमांक ६ नुसार सदर कामे सार्वजनिक बांधकाम विभाग/जिल्हा परिषद बांधकाम विभाग यांच्यामार्फत करण्यात यावीत.

८. उपरोक्त कामे अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीतीलच आहेत याची प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण विभाग, मुंबई यांनी खात्री करावी.

९. निधी वितरणाच्या मार्गदर्शक सूचना समाज कल्याण आयुक्त स्तरावरुन देण्यात याव्यात.

२. सदर प्रकरणी होणारा खर्च हा

मागणी क्रमांक एन-३,

मुख्य लेखाशिर्ष २२२५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण,

०१ अनुसूचित जातींचे कल्याण,

७८९, अनुसूचित जाती उपयोजना,

(०२) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५वी जयंती साजरी करणे,

(०२) (०१) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५वी जयंती साजरी करणे. (कार्यक्रम),

५३, मोठी बांधकामे,

लेखाशिर्ष २२२५ डी ८२३ याखाली खर्ची घालून तो सन २०१९-२० या वर्षात करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून भागविण्यात यावा. यासाठी आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अटींच्या अधिन राहून प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यास दर्शविण्यात आलेल्या सहमतीस अनुलक्षून त्यांच्या अनौसं-३३/१९/इमा-२, दिनांक ३१ जानेवारी,२०१९ या अनौपचारीक संदर्भान्वये काढण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८२६१२४८१८६४२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sunil D Sardar

Digitally signed by Sunil D Sardar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c0098eb68042c66b72115bc62ef9206ece42981aab126657128d7cadca447533, cn=Sunil D Sardar
Date: 2019.08.26 12:58:44 +05'30'

(सुनिल सरदार)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण विभाग,मुंबई.
३. कार्यकारी अभियंता, रत्नागिरी जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, चिपळूण, जि.रत्नागिरी.
४. श्री. नि. भि. भंडारे, कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ,मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, मुंबई.
५. श्री. ह. तु. साळुंके, कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ,मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, मुंबई.
६. उप विभागीय अभियंता, जिल्हा परिषद (कामे), उप विभाग, दापोली, जि. रत्नागिरी.
७. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, रत्नागिरी.
८. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी.
९. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारती-२), मंत्रालय, मुंबई.
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) -१, महाराष्ट्र, मुंबई.
११. महालेखापाल (लेखापरिक्षा) -१, महाराष्ट्र, मुंबई.
१२. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३. कक्ष अधिकारी (विनिमय / व्यय-१५), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प/विघयो), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय,मुंबई.
१५. निवड नस्ती /अजाक.